महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.०६/२०२२/जाहिरात दिनांक: १५ मार्च, २०२२

## -: शुध्दीपत्रक :-

**विषय : दंतशल्यचिकित्सक, सामान्य राज्य सेवा, गट-अ कमाल वयोमर्यादेमध्ये वाढ करणेबाबत**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक-०१४/२०२२**

शासनाच्या, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दंतशल्यचिकित्सक, सामान्य राज्य सेवा, गट-ब या संवर्गातील २८९ पदांच्या भरतीकरीता दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ०१४/२०२२) प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही २०२२/प्र.क्र.८/कार्या.१२, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार जाहिरातीमधील कमाल वयोमर्यादेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे:-

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान | कमाल वय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अमागास / मागासवर्गीय/ आ. दु. घ. | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | |
| १ जून, २०२२ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

२. **जाहिरातीमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.**

३. उपरोक्त बदलामुळे प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

**३.१ ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १९ मार्च, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**३.२ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक १९ मार्च, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**३.३ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**३.४ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २२ मार्च, २०२२ - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

४. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०१४/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई. सह सचिव, जाहिरात
दिनांक : १५ मार्च, २०२२ महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.